अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २२/०१/२०२५

## —: प्रेसनोट :—

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कडुन सापळा कारवाई

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०५/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्रीमती संगीता शाम गोखले, प्रभारी मुख्याध्यापिका, माध्यमिक शिक्षण मंडळ, मुलूंड नाईट हायस्कूल, मुलूंड (प), मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १९००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १९००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण झाले होते. सन २०१८ मध्ये पुढील शिक्षण घेण्याकरीता त्यांनी मुलूंड नाईट हायस्कूल, मुंबई येथे शाळा सोडल्याचा दाखला जमा करून ॲडमिशन घेतले होते. कोरोनामुळे लॉकडाऊन झाल्यानंतर व कौटुंबिक अडचणीमुळे तक्रदार यांना रात्री शाळेत जाणे शक्य झाले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शाळा सोडल्याचा दाखला मिळण्याकरीता तक्रारदार यांनी दिनांक ०४/०९/२०२४ व २४/१२/२०२४ रोजी मुलूंड नाईट हायस्कूल येथे विनंती अर्ज करून लोकसेवक मुख्याध्यापिका श्रीमती संगीता गोखले यांची भेट घेतली होती. परंतू लोकसेवक हे दाखला देण्याकरीता टाळाटाळ करीत होते. तक्रारदार यांचे जावई यांनीदेखील त्याच शाळेतून शिक्षण घेतले असल्याने त्यांनादेखील शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक होता. त्यानुसार दिनांक १३/०१/२०२५ रोजी तक्रारदार हे त्यांची मुलगी व जावई यांच्यासोबत जावून लोकसेवक मुख्याध्यापिका गोखले यांची भेट घेतली असता, लोकसेवक श्रीमती गोखले यांनी तक्रारदार यांचे दाखल्याकरीता रू. ६५०/- व त्यांचे जावई यांच्या दाखल्याकरीता रू. १२५०/- लागतील असे सांगून एकूण रू. १९००/- लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार व त्यांचे जावई यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक २१/०१/२०२५ रोजी समक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज केला.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार व त्यांचे जावई यांच्या शाळा सोडल्याचा दाखला देण्याकरीता एकूण रू. १९००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई कारवाई दरम्यान लोकसेवक श्रीमती संगीता शाम गोखले, मुख्याध्यापिका, मुलूंड नाईट हायस्कूल, मुंबई यांना तक्रारदार यांचेकडून रू. ६५०/- व तक्रारदार यांचे जावई यांचेकडून रू. १२५०/- असे एकूण रू. १९००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांचेविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारीः- श्री विजय पांचाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारीः- श्रीमती सुनिता दिघे, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

२२/०१/२०२५
( सचिन जाधवर )
अति. कार्यभार सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोल फ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :- acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :- acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :- www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :- www.acbmaharashtra.net